दिनांक ०५/०५/२०२२

# प्रेस नोट

## एमएसईबी कार्यालय वसई येथील ज्युनिअर इंजिनिअर व खाजगी इसमास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पालघर |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | माणिकपूर पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक ।। ८७/२०११, (सीआर/३८०/ठाणे/२०११) |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ८, १२, १३(१) (ड) सह १३(२) प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) आशिष रामकृष्ण मोटे, वय ५१ वर्षे, ज्युनिअर इंजिनियर, एमएसईबी., वालिव, ता. वसई, वर्ग–२<br>२) सखाराम पांडुरंग पवार, वय ६५ वर्षे, खाजगी इसम |
| मागितलेली लाचेची रक्कम | ६०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/– रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचे विद्युत मिटर जोडणीकरीता नमुद आरोपी अ.क्र. १) आशिष रामकृष्ण मोटे यांचेतर्फे अ.क्र. २) सखाराम पांडुरंग पवार, खाजगी इसम यांना तक्रारदार यांच्याकडून ४०,०००/–रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडुन, त्यांच्याविरुध्द माणिकपूर पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/०९/२०११ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. अतिरिक्त सत्र न्यायालय–१, वसई येथे नमुद आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी माननीय न्यायाधीश, श्री. सुधिर देशपांडे, अतिरिक्त सत्र न्यायालय–१, वसई येथे झाली असता, सुनावणी अंती नमुद आरोपीविरुध्द सबळ पुराव्यानिशी आरोप सिध्द झाल्याने दिनांक ०५/०५/२०२२ रोजी मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**आरोपी क्र. १**<br>अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये ४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/–रुपये(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने साधी कारावासाची शिक्षा.<br>ब) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) सह भादवि. १०९ प्रमाणे अन्वये ४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/–रुपये(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने साधी कारावासाची शिक्षा.<br>**आरोपी क्र २**<br>अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १२ अन्वये ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/–रुपये(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने साधी कारावासाची शिक्षा.<br><br>सदर गुन्हयाचा तपास श्री. हरिश खेडकर, तत्का.पोलीस उप अधीक्षक, अे.सी.बी., ठाणे यांनी केला असुन, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. जयप्रकाश पाटील तसेच पैरवी अधिकारी म्हणुन श्री. नवनाथ जगताप, पोउपअधी. व मपोना/श्रध्दा जाधव, अेसीबी., पालघर यांनी काम पाहीले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ – acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन – acbmaharashtra.net
टोल फ्री नं – १०६४
दुरध्वनी क्र. – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस ॲप क्र. – ९९३०९९७७००


(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे
कॅम्प पालघर

...प नाव | पदनाम